।। सा विद्या या विमुक्तये ।।
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

जनसंपर्क कार्यालय (PUBLIC RELATIONS OFFICE)
Phone: (02462) 229325 Website: www.srtmun.ac.in E-mail: srtmunpro1@gmail.com

संदर्भ क्र.: ज.का./२०२०-२१/ ३५७ दि.०३/०४/२०२१

## 'स्वारातीम' विद्यापीठांतर्गत हिवाळी -२०२० परीक्षांच्या सुधारित तारखा जाहीर

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत घेण्यात येणाऱ्या हिवाळी-२०२० परीक्षांच्या तारखांमध्ये बदल करण्यात आला आहे. कोव्हीड-१९ या विषाणूचा वाढता प्रादुर्भाव तसेच मा. जिल्हाधिकारी यांनी लॉकडाउन संदर्भाने निर्गमित केलेल्या सूचना आणि आदेश लक्षात घेऊन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. रवी सरोदे यांनी नवीन वेळापत्रक जाहीर केले आहे. क्लस्टर (महाविद्यालयाचा समूह) पद्धतीने महाविद्यालय स्तरावर व विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांच्या सुधारित तारखा खालीलप्रमाणे आहेत.

क्लस्टर पद्धतीने महाविद्यालय स्तरावर होणाऱ्या परीक्षेच्या सुधारित तारखा या खालील प्रमाणे आहेत.पदवी अभ्यासक्रम प्रथम वर्ष आणि बी.सी.ए., बी.सी.एस., प्रथम वर्ष पहिल्या व दुसऱ्या सत्राची पूर्वीची तारीख १ ते १२ एप्रिल अशी होती. ती आता सुधारित वेळापत्रकानुसार ०६ ते १७ एप्रिल अशी आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रम व इतर व्यावसायिक अभ्यासक्रम पहिले व दुसरे सत्राच्या परीक्षा पूर्वीच्या तारखा १० ते २० एप्रिल अशा होत्या. या तारखामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही. म्हणजेच त्यापूर्वीच्या तारखा प्रमाणे परीक्षा १० ते २० एप्रिल दरम्यान होणार आहेत. औषधनिर्माण शास्त्र, अभियांत्रिकी, विधी, बी.एड., एम.एड., एम.बी.ए., एम.पीएड., प्रथम वर्ष अभ्यासक्रम पहिल्या व दुसऱ्या सत्राच्या परीक्षेच्या तारखेत कोणताही बदल करण्यात आलेला नाही त्या पूर्वी प्रमाणेच २० ते ३० एप्रिल दरम्यान होणार आहेत.

विद्यापीठ स्तरावर होणाऱ्या परीक्षांच्या तारखा या पुढीलप्रमाणे आहेत. सर्व पदवी व व्यवसायिक अभ्यासक्रम जसे की, बी.सी.ए., बी.सी.एस., बी.एस्सी., (एच.एस., आय.टी., एन.टी., बी.टी.,बी.आय., एफ.एस.,) व इतर सर्व बी.व्होक, अभियांत्रिकी, विधी, व फार्मसी अंतिम वर्षाच्या परीक्षा पूर्वीच्या तारखेप्रमाने २२ ते ३१ मार्च दरम्यान होणार होत्या त्या आता ०६ ते १६ एप्रिल दरम्यान होणार आहेत. पदव्युत्तर एम.ए., एम.कॉम, एम.एस्सी., व व्यवसायिक अभ्यासक्रम बी.एड., एम.एड., बी.पीएड, एम.पीएड., बी.लिब., एम.लिब., बी.जे., एम.जे., अभ्यासक्रम अंतिम वर्ष तसेच एक वर्ष पदविका परीक्षा पूर्वी २२ ते ३१ मार्च दरम्यान होणार होत्या त्या आता १७ ते २६ एप्रिल दरम्यान होणार आहेत. सर्व संकुले, विद्यापीठ परिसर, उपकेंद्र लातूर, परभणी येथील सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रम पहिल्या व दुसऱ्या सत्राच्या परीक्षा पूर्वी ०१ ते १० एप्रिल दरम्यान होणार होत्या त्या आता १५ ते २४ एप्रिल दरम्यान होणार आहेत.

वरील प्रमाणे हिवाळी-२०२० परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पूर्वनियोजित पद्धतीने घेण्यात येणार आहेत. ऑफलाईन पद्धतीने महाविद्यालयीन स्तरावर व परीक्षा केंद्रावर परीक्षा घेताना शासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या कोव्हीड-१९ या विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनाचे पालन करण्यात यावे, असे अवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. रवी सरोदे यांनी केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/ जिल्हा प्रतिनिधी,
दैनिक/इलेक्ट्रॉनिक मेडिया/सामाजिक संपर्क माध्यम,
सप्रेम नमस्कार,
मान्यवर/ महोदय,
उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिद्धीस देऊन सहकार्य करावे, ही नम्र विनंती.
आपला विश्वासू,
जनसंपर्क अधिकारी,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
ज्ञानतीर्थ, विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६.